


# शाश्वत यज्ञ


# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

डिसेंबर २०२५

वर्ष ५० अंक १२



श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

(श्रीमाताजींनी दिलेला संदेश...)

सावित्रीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या महाकाव्याचा विषय वैश्विक आहे आणि त्यात प्रकट झालेले सत्य हे भविष्यसूचक आहे. सावित्रीच्या वातावरणात व्यतीत केलेला वेळ कधीही व्यर्थ जाणार नाही.

– श्रीमाताजी (CWM 13 : 26)

*

## शाश्वत यज्ञ

संपादकीय........................................................०२
दिव्य मानवतेच्या दिशेने..............................................०४
शाश्वत उपस्थिती ..................................................१०
सावित्री महाकाव्याची थोरवी...........................................२६

---

## संपादकीय

५ डिसेंबर १९५० हा श्रीअरविंदांच्या महासमाधीचा दिवस. त्यांनी पृथ्वीवासीयांना तीन महत्त्वपूर्ण गोष्टी प्रदान केल्या. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी श्रीमाताजींमध्ये माईंड ऑफ लाईट म्हणजे 'ज्योतिर्मय मन' संक्रमित केले. ज्योतिर्मय मनाचा स्वीकार करण्याची ज्या कोणाची तयारी झालेली असेल त्यांच्यामध्ये त्याचे संक्रमण होऊ शकते, ही एक शक्यता त्यांनी प्रदान केली. दुसरी अभूतपूर्व गोष्ट म्हणजे त्यांनी स्वतःचा देह समर्पित करून, त्या योगदानाद्वारे अतिमानसिक चेतना जडभौतिकामध्ये सुस्थिर केली. आणि तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी 'सावित्री महाकाव्य' समस्त मानवजातीला प्रदान केले.

श्रीअरविंदांच्या महासमाधीचे आणि सावित्री महाकाव्याच्या निर्मितीचे हे पंचाहत्तरावे वर्ष आहे. त्यास 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक समर्पित करत आहोत...

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.



## ज्योतिर्मय मनाचे संक्रमण

श्रीअरविंदांनी त्यांच्या देहामध्ये मोठ्या प्रमाणात अतिमानसिक शक्तीचा संचय केला होता आणि जेव्हा त्यांनी देह ठेवला तेव्हा... मी त्यांच्या बिछान्याशेजारी उभी होते. तेव्हा ती सर्व अतिमानसिक शक्ती त्यांच्या देहामधून माझ्या देहामध्ये संक्रमित झाली. मला त्या संक्रमणाची कंपनेसुद्धा जाणवली. हे संक्रमण अतिशय सघन होते. मला वाटते की, असे शक्तिसंक्रमण होत आहे, हे एखाद्याला दिसू शकले असते इतके ते सघन होते. अतिशय अद्‌भुत, विलक्षण गोष्ट होती ती! तो एक अगदी अलौकिक अनुभव होता. मी शेजारी उभी होते. हे शक्तिसंक्रमण खूप वेळपर्यंत चालू होते. ही अगदी सघन अशी अनुभूती होती.

– श्रीमाताजी (CWM 11 : 328)

*

# दिव्य मानवतेच्या दिशेने...

## नूतन मानवता आणि आपले कर्तव्य

'नूतन मानवता' याचा आमच्या दृष्टीने काय अर्थ आहे? तर, ही मानवता म्हणजे एका मनोमय जिवांच्या वंशाचा किंवा प्रजातीचा उदय आणि विकास असेल. ज्ञानासाठी धडपडणारे अज्ञानमय मन हे त्या वंशाच्या मानसिकतेचे तत्त्व नसेल. ते मन त्याच्या ज्ञानावस्थेत असताना अज्ञानाने बांधले गेलेले नसेल. जे मन प्रकाशपूजक आहे पण ज्याला प्रकाशाचा स्वाभाविक वारसा लाभलेला नाही असे ते मन नसेल. जे मन प्रकाशाप्रत खुले झालेले आहे पण जे प्रकाशात वास्तव्य करत नाही, असे ते मन नसेल. अजूनपर्यंत अज्ञानदशेमधून बाहेर पडू न शकलेले, परिपूर्ण साधन न झालेले आणि सत्य-चेतना नसलेले, असे ते मन नसेल. तर, ज्याला 'ज्योतिर्मय मन' (mind of Light) असे म्हणता येईल असे हे मन या वंशाला आधीपासूनच लाभलेले असेल.

सत्यामध्ये जीवन जगण्याची क्षमता या ज्योतिर्मय मनामध्ये असेल. त्याच्याकडे सत्य-चेतन असण्याची क्षमता असेल. तसेच या मनामध्ये, स्वतःच्या जीवनात, अप्रत्यक्ष ज्ञानाऐवजी प्रत्यक्ष ज्ञान आविष्कृत करण्याची क्षमता असेल. त्याची मानसिकता ही अज्ञानाचे साधन नसून, प्रकाशाचे साधन असेल. या मानसिकतेच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये असताना, त्याच्या अंगी अतिमानसामध्ये प्रवेश करण्याची क्षमतासुद्धा असू शकेल. (ज्योतिर्मय मनाचा उपजत वारसा लाभलेल्या) या नूतन वंशामधूनच अतिमानसिक जिवांची निवड केली जाईल. असे अतिमानसिक जीव हे पृथ्वी-प्रकृतीच्या उत्क्रांतीचे अग्रणी असतील.

– श्रीअरविंद (CWSA 13 : 585)

(श्रीअरविंदलिखित वरील मजकुराचे वाचन करून झाल्यावर श्रीमाताजींनी पुढील विवेचन केले.)

श्रीअरविंदांच्या दिव्य दृष्टीस दिसलेला अतिमानव हा, सद्यस्थितीतील

मानवता आणि अतिमानसिक रितीने जन्माला आलेला अतिमानसिक जीव यांच्या दरम्यानची अवस्था असेल. त्याच्यामध्ये पशुपातळीशी संबंधित असे काहीही शिल्लक नसेल आणि सर्व प्रकारच्या पशुवत गरजांपासून तो जीव मुक्त असेल.

सद्यस्थितीमध्ये आपण सामान्य पशुपद्धतीने जन्माला आलेलो आहोत आणि म्हणूनच, आपण जरी स्वतःचे रूपांतरण केले तरीसुद्धा त्यामध्ये पशुप्रवृत्तीशी निगडित काही अंश शिल्लक राहणारच. श्रीअरविंदांनी ज्या अतिमानसिक जिवाची धारणा केली आहे त्याची घडण सामान्य पशुपद्धतीनुसार झालेली नाही. तर, जी प्रक्रिया आपल्याला आजच्या घडीला अगम्य वाटते अशा एका प्रक्रियेच्या माध्यमातून त्याची थेटपणे घडण झालेली आहे. त्याची घडण सामान्य पशुतत्त्वानुसार झालेली नाही तर, त्यामध्ये द्रव्याची आणि शक्तींची अशा रितीने थेट हाताळणी केलेली आहे की जेणेकरून, शरीर 'प्रत्यक्षीभूत' (materialisation) होऊ शकेल.

अशा प्रकारचे (सद्यकालीन मानववंश आणि भावी अतिमानसिक जीव यांच्या) दरम्यानचे जीव आवश्यक आहेत, हे अगदी स्वाभाविक आहे. हे जे जीव आहेत त्यांनी अतिमानसिक जिवांच्या निर्मितीची साधने शोधणे आवश्यक आहे. आणि अगदी निःसंशयपणे, श्रीअरविंदांनी जेव्हा वरील वचन लिहिले आहे तेव्हा आपण हेच केले पाहिजे याची त्यांना पूर्ण खात्री होती. श्रीअरविंदाची आपल्याकडून नेमकी हीच अपेक्षा आहे. त्यांची अपेक्षा आपण प्रत्यक्षात उतरविली पाहिजे हे आता निश्चित झाले आहे, हे मला ज्ञात आहे, असे मला वाटते.

आता ती केवळ आशा राहिलेली नाही तर ती आता निश्चितता आहे. एवढेच की, आपले व्यक्तिगत प्रयत्न, आपली एकाग्रता, आपली सदिच्छा आणि मुख्य म्हणजे, आपण या तथ्याला किती महत्त्व देतो, यानुसार ते प्रत्यक्षात उतरण्यासाठी कमी-अधिक किती कालावधी लागेल हे अवलंबून असेल.

जो जाणीवपूर्वक निरीक्षण करणारा नाही, त्याला गोष्टी पूर्वीप्रमाणेच, आहे तशाच (म्हणजे मागील पानावरून पुढे चालू अशा पद्धतीने) चालू आहेत असे वाटेल; पण ज्याला वरकरणी गोष्टींपाठीमागील सत्य कसे पाहायचे याची जाण आहे आणि वरकरणी दृश्यांमुळे ज्याची फसगत होत नाही, त्याला सर्व गोष्टी सुरळीत चाललेल्या आहेत, असे दिसून येईल.

आपल्याला जे सर्वोतम करणे शक्य आहे ते आपण प्रत्येकाने करू या. असे केले तर, सर्वांना दिसू शकतील असे पहिलेवहिले दृश्य परिणाम दिसण्यास कदाचित फार कालावधी लागणार नाही. जगातील इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा तुम्हाला या गोष्टीमध्ये अधिक स्वारस्य वाटते का, हे तुमचे तुम्हीच जाणून घ्यायचे आहे. असा एक क्षण येतो की जेव्हा, या रूपांतरणाएवढी जगातील दुसरी कोणतीच गोष्ट शरीराला जीवनावश्यक वाटत नाही. रूपांतरणामध्ये जेवढा रस वाटतो तेवढा रस दुसऱ्या कोणत्या गोष्टीमध्येच असू शकत नाही, याची शरीराला जाणीव होते.

जो दिव्य प्रकाश आविष्कृत होऊ पाहत आहे, त्या दिव्य प्रकाशाची शरीरातील पेशींना जणू तहान लागते, त्यासाठी त्या जणू हट्ट करू लागतात. त्यांना त्या दिव्य प्रकाशामध्ये अतीव आनंदाचा अनुभव येतो आणि त्यांना विजयाची खात्री असते. शरीराच्या पेशींमध्ये असलेली ही अभीप्साच मी तुमच्यापर्यंत पोहोचवू इच्छिते. जेव्हा तुम्हाला हे उमगेल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की, याच्या तुलनेत इतर सर्व गोष्टी कंटाळवाण्या, अळणी, निरर्थक, निरुपयोगी आहेत. दिव्य प्रकाशामध्ये रूपांतरित होणे हेच फक्त महत्त्वाचे आहे.

– श्रीमाताजी (CWM 09 : 191-192)

*

## नूतन मानवतेची वैशिष्ट्ये

(जडभौतिकापासून वनस्पती, प्राणी, मानव आणि त्याच्या पुढे होणाऱ्या उत्क्रांतीच्या वाटचालीबद्दल श्रीअरविंदांनी येथे सांगितले आहे.)

उत्क्रांतीच्या या अपरिहार्य वाटचालीमध्ये 'ज्योतिर्मय मन' ही एक

श्रेणी असणार आहे, तो एक अटळ असा टप्पा असणार आहे. उत्क्रांत होत जाणारे तत्त्व या दृष्टीने, तो मानवी आरोहणामधील एक टप्पा असणार आहे. आणि त्यामधून मनुष्याची एक नवीन प्रकारची प्रजाती उदयाला येणार आहे. या विकसनामध्ये, आरोहण करणाऱ्या मानवतेचे स्वतःचे असे प्रकार आणि मानवतेच्या स्वतःच्या शक्तींच्या आरोहणाची श्रेणी समाविष्ट होणे आवश्यकच आहे. त्यामध्ये पुढील गोष्टी मूर्त रूपात येतील –

- या मानवतेचा आध्यात्मिकतेकडे अधिकाधिक ओढा असेल.
- या मानवतेमध्ये दिव्य प्रकाश धारण करण्याची क्षमता असेल.
- ही मानवता, दिव्य झालेल्या मानवतेच्या आणि दिव्य जीवनाच्या दिशेने आरोहण करेल.

– श्रीअरविंद (CWSA 13 : 587)

*

## अतिमानस स्थिर होण्याची आवश्यकता

शारीर–मन (body-mind) हे अगदी संवेद्य असे सत्य आहे. त्याची तमोमयता, तसेच गतकालीन गतिविधींना यांत्रिकरित्या चिकटून राहणे आणि नवीन गोष्टींचे सहजपणे विस्मरण होणे आणि त्यांना नकार देणे यामुळे, शारीर–मनाचा अतिमानसिक शक्तीच्या समावेशनासाठी आणि शरीराच्या कार्यप्रणालीमधील रूपांतरणासाठी फार मोठा अडथळा होतो असे आपल्याला आढळते. आणि तेच दुसऱ्या बाजूला, जर या शारीर–मनाचे एकदा का परिणामकारकरित्या परिवर्तन झाले तर, तेच शारीर–मन हे जडभौतिक प्रकृतीमध्ये अतिमानसिक प्रकाश आणि अतिमानसिक शक्ती स्थिर करण्यासाठीचे एक बहुमूल्य साधन होऊ शकेल.

– श्रीअरविंद (CWSA 28 : 189)

(श्रीअरविंदलिखित वरील पत्राचा उल्लेख करून श्रीमाताजी त्याविषयी २२ डिसेंबर १९७१ रोजी सांगत आहेत...)

श्रीअरविंदांचे एक पत्र मला वाचून दाखविण्यात आले, त्यात त्यांनी

म्हटले आहे की, अतिमानस (तत्त्व) येथे स्थिर होण्यासाठी, ते येथे टिकून राहण्यासाठी ते शारीर–मनामध्ये प्रविष्ट झाले पाहिजे आणि तेथे स्थिर झाले पाहिजे. श्रीअरविंदांमध्ये अतिमानस प्रविष्ट होत आहे आणि परत जात आहे, काही काळाने परत त्यांच्यामध्ये प्रविष्ट होत आहे, पुन्हा माघारी फिरत आहे, ते स्थिर होत नाहीये, हे श्रीअरविंदांच्या लक्षात आले होते.

आता गेले कित्येक महिने माझ्यामध्ये हेच कार्य केले जात आहे. मन निवृत्त झाले आहे आणि शारीर–मनाने त्याची जागा घेतली आहे. गेला काही काळ माझ्या नेमकेपणाने हेच निरीक्षणास आले आहे की, हे मन आता प्रत्येक गोष्टच निराळ्या रितीने पाहू लागले आहे, प्रत्येक गोष्टीसोबत असलेले त्याचे नाते आता निराळेच झाले आहे. माझ्या हे लक्षात आले आहे की, हे शारीर–मन, या शरीरामध्ये असणारे जे मन आहे ते विशाल झाले आहे; त्याला गोष्टींविषयक एक वैश्विक दृष्टिकोन प्राप्त झाला आहे आणि आता त्याचा गोष्टींकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पूर्णपणे निराळा झाला आहे. मी हे पाहिले आहे की, अतिमानसाचे कार्य येथे चालू आहे.

मी सध्या एका असामान्य कालावधीमधून जात आहे.

– श्रीमाताजी (CWM 11 : 284)


*

## अतिमानसाचे आविष्करण

पृथ्वीवर अतिमानसाचे आविष्करण होणार आहे, हे आता केवळ अभिवचन राहिलेले नसून, ते एक जिवंत वास्तव बनले आहे, ती वस्तुस्थिती झाली आहे. अतिमानस आता इथे सक्रिय आहे आणि एक दिवस असा येईल की अगदी अंध, अगदी अचेतन, किंबहुना अत्यंत अनिच्छुक असणाऱ्या व्यक्तीलासुद्धा त्याची ओळख पटेल.

– श्रीमाताजी (CWM 15 : 96)

**



## अभिवचन

(श्रीअरविंदांनी ०५ डिसेंबर १९५० रोजी देह ठेवला. त्यानंतर श्रीमाताजींनी लिहिले आहे....)

हे प्रभो, तुमचे कार्य जोपर्यंत साध्य होत नाही तोपर्यंत तुम्ही आमच्यासोबत असाल; मार्गदर्शन आणि प्रबोधन करणारी केवळ चेतना म्हणूनच नव्हे तर, कृतीमधील गतिशील 'उपस्थिती' म्हणूनदेखील तुम्ही आमच्यासोबत असाल, असा विश्वास तुम्ही आज सकाळी मला दिला आहे. जोपर्यंत पृथ्वीचे रूपांतरण होत नाही तोपर्यंत तुमच्यामधील सारे सारेकाही येथेच राहील; तोपर्यंत तुम्ही पृथ्वीचे वातावरण सोडून जाणार नाही, असे अगदी निःसंशय वचन तुम्ही दिले आहे. या अद्भुत 'उपस्थिती'ला आम्ही सुपात्र ठरावे आणि यापुढे, आमच्यामधील प्रत्येक गोष्ट तुमच्या उदात्त कार्याच्या परिपूर्तीसाठी अधिकाधिक परिपूर्णपणे समर्पित व्हावी या एकाच इच्छेवर केंद्रित होवो, असे आम्हाला वरदान द्या.

– श्रीमाताजी (CWM 13 : 06)

*

# शाश्वत उपस्थिती

## श्रीअरविंद-समाधीचा प्रभाव

'श्रीअरविंदांच्या समाधी'च्या आजूबाजूला श्रीअरविंदांची उपस्थिती सघन स्वरूपात जाणवते, ती स्पंदित होत असते. त्यांचा प्रभाव अंतरंगात खोलवर शिरतो आणि व्यक्तीच्या केंद्रवर्ती अस्तित्वाला स्पर्श करतो, तेथे जाऊन तो, चेतनेला आध्यात्मिक जीवनाच्या दिशेने जागृत करतो. अगदी अज्ञेयवादी लोक, नास्तिक, दुरिच्छा बाळगणाऱ्या व्यक्ती केवळ उत्सुकता म्हणून जरी समाधीपाशी आल्या तरी त्या येथील अगम्य किमयेमुळे आश्चर्यचकित होऊन परत जातात; त्यांना आंतरिक शांती लाभते कारण येथे श्रीअरविंद त्यांच्या शांतीचा आणि करुणेचा सातत्याने वर्षाव करत असतात. समाधीसमोरून जात असताना त्या व्यक्ती या वर्षावामध्ये न्हाऊन निघतात. श्रीअरविंदांच्या शक्तीने आणि उपस्थितीने भारलेली ही कृती अगदी आश्चर्यकारक वाटावी अशी आहे.

मी जेव्हा समाधीकडे पाहते, तिथे काय चालले आहे ते पाहते तेव्हा रूपांतरणकारी शक्तीने आणि ऊर्जेने स्पंदित होणारा प्रकाशस्तंभ पाहून मी आश्चर्यचकित होते. (श्रीमाताजी हातांची ऊर्ध्वगामी हालचाल करून दाखवितात.) अशा रितीने तो प्रकाशस्तंभ वर वर जात असतो. समाधीच्या लांबीरुंदीएवढा प्रकाशस्तंभ प्रकाशाच्या ओजस्वितेने आणि त्याच्या तेजस्वितेने वर वर उसळत असतो. (अतिमानसिक जगताचा) 'नूतन प्रकाश' अशा रितीने तेथे मूर्त रूपात व्यक्त होत असतो...

समाधीपाशी दर्शनाला आलेल्या माणसांमुळे तेथे मिथ्यत्वाच्या ज्या काही रचना, इच्छावासना, अधीर विनवण्या, सर्व तऱ्हेची गाऱ्हाणी, तक्रारी, दुरिच्छा, आजारपण, विरोधी शक्ती रेंगाळलेल्या असतात, त्या सर्व गोष्टी काढून टाकण्याचे आणि हे स्थान पुन्हा पूर्ववत शांतिपूर्ण व मनोरम करण्याचे काम काही जीव, रात्रीच्या वेळी जेव्हा सामसूम होते तेव्हा करत असतात. ते जीव येथील संपूर्ण वातावरण अतीव प्रेमाने शुद्ध

करतात त्यामुळे तेथे श्रीअरविंदांची उपस्थिती जाणवते.

*

समाधी–परिसर हे गप्पागोष्टी करण्याचे ठिकाण नाही, तर ध्यानासाठी हे अत्यंत पवित्र स्थान आहे. तिथे कधीही गप्पागोष्टी करता कामा नयेत कारण तसे केल्यामुळे वातावरण दूषित होते. श्रीअरविंद तिथे त्यांच्या गौरवशाली देहानिशी उपस्थित आहेत. त्यांनी एका सूक्ष्म क्रियेच्या साहाय्याने संपूर्ण जग स्वतःमध्ये धारण केले आहे. ते त्यांची चेतना क्रमाक्रमाने आविष्कृत करत आहेत. ईश्वरी अवतरणासाठी त्यांनी ती चेतना अंशतः प्रकट केली आहे. श्रीअरविंद हे आपल्या दिव्य शक्यतांचे एक चैतन्यमय आश्वासन आहेत; दिव्य प्रकाश आणि दिव्य शक्तीने प्रस्फुरित होणाऱ्या दिव्यत्वाचे म्हणजे ईश्वरी आविष्करणाकडे सुरू असलेल्या वाटचालीचे ते जणू अभिवचन आहेत. आणि त्यामुळेच येथील सर्व वातावरण हे दिव्य आणि उदात्त शांतीने भारलेले आहे.

तिथे श्रीअरविंद स्वतः दिव्य शरीरामध्ये उपस्थित आहेत, ते दिव्यत्व पावले आहेत, ते आपल्या समग्र मानवतेचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांनी, त्यांच्या तपस्येच्या साहाय्याने आणि त्यांनी त्यांच्या देहामध्ये जी साधना केली आहे, त्या साधनेच्या साहाय्याने, त्यांचा देह तेजस्वी झाला आहे. त्यांना जे अनुभव आले, त्यांना जे साक्षात्कार झाले, त्यांनी योगसाधनेच्या साहाय्याने त्यांच्या देहामध्ये जे साठवून ठेवले आहे त्यामुळे त्यांचा देह हा एका रूपांतरकारी शक्तीने भारलेला आहे. त्यांचा देह ओसंडून वाहणाऱ्या शक्तीने व प्रकाशाने भारलेला आहे आणि त्याने येथील समग्र वातावरण व्यापून राहिले आहे. सर्वत्र त्यांचीच उपस्थिती आहे. 'अतिमानसिक' शक्तीमुळे ही उपस्थिती टिकून राहते. ती शक्ती कमी होण्याच्या कोणत्याही खुणा येथे दिसत नाहीत आणि तशा खुणा दिसणे शक्यच नाहीत.

*

लोक जेव्हा समाधीजवळून जातात तेव्हा त्यांच्याही नकळत ते श्रीअरविंदांच्या प्रेमामध्ये न्हाऊन निघतात आणि जेव्हा ते समाधीजवळ जातात तेव्हा ते भारावून का जातात हे त्यांचे त्यांनाच समजत नाही. सारेच आश्चर्यजनक आहे हे!

लोक जेव्हा समाधीला स्पर्श करतात तेव्हा ते स्तिमित होतात. कारण तेथे सातत्याने कार्यकारी असणारी शक्ती त्यांच्यातील तथाकथित धार्मिक भावना नाहीशा करून टाकते, स्वर्गाप्रत जाण्यासाठी धडपडणाऱ्या भावभावना, कल्पना धुळीला मिळविते आणि त्यांना ती शक्ती अशा एका वास्तवासमोर उभी करते की, ज्याबद्दल त्यांना काहीच माहीत नसते. तेथे प्रकट होणाऱ्या सत्याच्या या विलक्षण घटनेने ते थक्क होऊन जातात.

त्यांच्यापैकी जे खुले असतात ते त्याने स्पर्शित होतात आणि वातावरणामध्ये असलेली शांती स्वतःच्या अस्तित्वामध्ये भरून घेण्यासाठी आणि त्या शक्तीने पुनःप्रभारित (recharge) होण्यासाठी पुन्हापुन्हा येथे येतात.

श्रीअरविंदांची उपस्थिती इतकी सघन आणि चैतन्यमय आहे की, जणूकाही सचेत महाकाशाचे येथे वर्चस्व असावे आणि त्याने वातावरण भरून गेलेले असावे. गंधर्वनगरीसारख्या स्वप्नवत रंगांमध्ये आणि प्रकाशामध्ये ते वातावरण तरंगत आहे असे मला दिसत आहे; कवेत न सामावू शकणाऱ्या आनंदसौंदर्याने, एक प्रकारच्या विशुद्ध वृत्तीने आणि अवर्णनीय अस्तित्वाने हे वातावरण भारले आहे, असे मला दिसत आहे. ते अमूर्त असले तरी जणू प्रत्यक्ष असल्यासारखे सघन वाटत आहे, एक प्रकारचे अज्ञात माधुर्य श्रीअरविंद या जगात घेऊन आले आहेत.

मला असे वाटते की, एखादी व्यक्ती जर एकाग्र होऊन, ईश्वराप्रत उत्कटतेने अभीप्सा बाळगून, समाधीसमोर उभी राहील आणि अन्य कशाची नाही तर, फक्त त्याच्या परमानंदाची इच्छा बाळगेल तर आजवर

या पृथ्वीला कधीही ज्ञात नसलेल्या अशा आनंदाच्या किंवा सर्वशक्तिमान स्वर्गांनीसुद्धा ज्या आनंदाचा अनुभव कधी घेतला नसेल, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने चांगल्या आणि अधिक उच्चतर आनंदाच्या प्रदेशामध्ये ती व्यक्ती जाऊन पोहोचेल.

– श्रीमाताजी (Blessings of the Grace by Mona Sarkar)

*

## सूक्ष्म भौतिकातील श्रीअरविंदांचे वास्तव्य

(श्रीमाताजी २४ जुलै १९५९ रोजी त्यांना आलेल्या अनुभवाविषयी येथे सांगत आहेत.)

त्या दिवशी मी अचानकपणे श्रीअरविंदांच्या सूक्ष्म भौतिकामधल्या निवासस्थानी जाऊन पोहोचले होते. जणूकाही मी एक पाऊल टाकले आणि या जडभौतिक जगापेक्षा कितीतरी पटीने अधिक सघन असणाऱ्या त्या जगात प्रवेश केला. ते जग अधिक सघन होते कारण तेथील वस्तुंमध्ये अधिक सत्य सामावलेले होते. मी तिथे श्रीअरविंदांसमवेत काही काळ व्यतीत केला आणि जेव्हा माझे तिथले कार्य पूर्ण झाले तेव्हा मी एक पाऊल टाकले आणि मी परत इथे आलेले होते. परत आले तेव्हा येथील सर्व गोष्टींचे भान येण्यासाठी मला थोडा वेळ लागला कारण आता मला आपले हे जग भासमान वाटत होते, ते दुसरे जग (सूक्ष्म भौतिक जग) मला अधिक सघन वाटत होते.

पण सांगायचा मुद्दा असा की, तुम्ही एक पाऊल टाकता आणि तुम्ही दुसऱ्या खोलीत असता. (तसेच मृत्युनंतरच्या जीवनाबाबत असते.) जेव्हा तुम्ही आत्म्यामध्ये स्थित राहून जीवन जगत असता तेव्हा एक प्रकारचे सातत्य टिकून राहते; कारण आत्म्याला स्मरण असते. तो सारेकाही स्मरणात ठेवत असतो. त्याला सर्व घटनाप्रसंग, अगदी बाह्य घटनासुद्धा स्मरणात असतात. म्हणजे आत्म्याशी संबंधित झालेल्या सर्व बाह्यवर्ती घटना त्याच्या स्मरणात असतात. तेव्हा ती एक सातत्यपूर्ण,

अविरत चालणारी वाटचाल असते. इथे आणि इथून तिथे, एका खोलीतून दुसऱ्या खोलीत, एका घरातून दुसऱ्या घरामध्ये जावे त्याप्रमाणे व्यक्ती एका जीवनामधून दुसऱ्या जीवनात जाते.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple, June 24, 1961)

*

## श्रीअरविंदांचे सूक्ष्म भौतिकातील कार्य

(श्रीअरविंद देहामध्ये होते तेव्हा त्यांनी केलेले कार्य आणि त्यांनी देह ठेवल्यानंतर ते करत असलेले कार्य यामध्ये काही फरक आहे का, असा प्रश्न एका साधकाने श्रीमाताजींना विचारला आहे. त्यावर श्रीमाताजींनी दिलेले हे उत्तर...)

कार्याच्या शक्तीमध्ये फरक आहे. श्रीअरविंद देहात असताना त्यांच्यामध्ये जी कार्यशक्ती होती, त्यापेक्षा अधिक कार्यशक्ती आता त्यांच्याकडे आहे, आता ते अधिक कार्य करू शकतात. त्यासाठीच तर त्यांनी देह ठेवला होता ना? कारण त्यांना तशाच पद्धतीने कार्य करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. आता ते कार्य अगदी सघन आहे. त्यांचे कार्य आता अधिक सघन झाले आहे. अर्थातच आताचे त्यांचे कार्य मानसिक प्रांतातील नसून, ते उच्चतर प्रांतातील आहे. पण म्हणून ते काहीतरी आकाशस्थ आहे असेही नाही... ते अगदी मूर्त, सघन आहे. ते कार्य इतके सघन आहे की ते जणूकाही अगदी द्रव्यमय आहे, असेसुद्धा एखादी व्यक्ती त्याविषयी म्हणू शकेल.

– श्रीमाताजी (CWM 11 : 329)

*

## पृथ्वी-चेतनेचे रूपांतरण

(मानसिक चेतनेच्या अतीत असणाऱ्या उच्चतर चेतनेमध्ये प्रवेश करायचा आणि तेथे जीवन जगायचे किंवा पृथ्वी-चेतनेमध्ये परिवर्तन, रूपांतरण घडवायचे या कल्पनाच एके काळी कोणाच्या विचारात नव्हत्या पण श्रीअरविंद यांनी जे परिश्रम केले त्यामुळे त्या आता शक्य होत

आहेत असे श्रीमाताजी सांगत आहेत.)

आता मला स्पष्टपणे दिसत आहे की, श्रीअरविंदांनी महासमाधी घेणे आणि त्यांचे कार्य... किती विशाल आहे, सूक्ष्म भौतिक जगामध्ये ते किती सातत्याने परिश्रम घेत आहेत आणि त्याचा येथील कार्यासाठी किती उपयोग झाला आहे, हे मला स्पष्टपणे दिसत आहे. जडभौतिकाच्या रचनेमध्ये परिवर्तन घडविण्यासाठी, गोष्टींची पूर्वतयारी करण्यासाठी श्रीअरविंदांच्या त्या कार्याची कशी मदत होत आहे, हे मला दिसत आहे.

आजवर इतरांना जे जे (उच्च आध्यात्मिक) अनुभव आले त्यामुळे ते उच्चतर जगतांच्या संपर्कात आले. पण त्यांनी हे जडभौतिक जग मात्र जसे आणि जिथे होते, तसे आणि तिथेच सोडून दिले...

माझ्या जीवनाच्या आरंभापासून ते श्रीअरविंदांच्या महासमाधीपर्यंत, मी अशा चेतनेमध्ये वावरत होते, माझी अशी धारणा होती की, व्यक्ती उन्नत होऊ शकते, तिला ज्ञान होऊ शकते, तिला सर्व प्रकारचे अनुभव येऊ शकतात (आणि खरोखर तसे अनुभव येतात.) पण नंतर व्यक्ती जेव्हा परत शरीरात येते तेव्हा पुन्हा एकदा त्या व्यक्तीवर त्याच त्या जुन्या, बलदंड मानसिक कायद्याचा अंमल सुरू होतो. मध्यंतरीची ही गेलेली सगळी वर्षं ही पूर्वतयारीची वर्षं होती, त्या कायद्यांपासून सुटका होण्यासाठी लागलेली वर्षं होती. मात्र आता असे दिसते आहे की, (त्या कायद्यांपासून सुटका होण्याची) मान्यता शरीराकडून मिळाली आहे. हो, आता परिवर्तन झाले आहे. आता त्याच्या सर्व तपशिलानिशी ते परिवर्तन 'प्रत्यक्षात उतरवावे लागेल;' परंतु आता परिवर्तन झाले आहे.

– श्रीमाताजी (CWM 11 : 229)

*

## पृथ्वीवर ईश्वराचे साम्राज्य

श्रीअरविंदांच्या सघन उपस्थितीने समाधीची ही जागा भारलेली आहे. श्रीअरविंदांच्या चेतनेशी सायुज्य पावण्याची जे खरोखरच मनापासून

अभीप्सा बाळगतात अशा व्यक्तींना आणि श्रीअरविंदांच्या शिष्यांना येथे श्रीअरविंदांच्या ऐश्वर्यशाली उपस्थितीची भव्यता अनुभवायला मिळते. आत्ता तुम्ही मला जितक्या स्पष्टपणे पाहता आहात, अगदी तितक्याच सघनपणे त्यांची उपस्थिती अनुभवास येते. त्यांच्याशी जे संवाद साधू इच्छितात त्यांना श्रीअरविंदांकडून निरपवादपणे उत्तर मिळते. ते तेथे आहेत.

श्रीअरविंद त्यांच्या सर्व शक्तींसहित सर्व–शक्तिशाली अशा स्वरूपात तेथे आहेत आणि अव्यक्तपणे, कायम आग्रहपूर्वक आणि विश्वास बसणार नाही इतक्या संयमाने ते 'नूतन जगता'ची अध्यक्षता करत आहेत आणि त्यांच्या कार्यपद्धतीनुसार म्हणजे अत्यंत निग्रहाने ते एकापाठोपाठ एक विजय संपादन करत चालले आहेत. प्रथमतः त्यांना मानवतेच्या चेतनेमध्ये परिवर्तन घडवायचे आहे आणि नंतर या चेतनेच्या सर्व पैलूंमध्ये रूपांतरण घडवायचे आहे. श्रीअरविंदांना हे ज्ञात आहे की, हे सर्व विरोध आणि ही क्षणिक अधःपतने, मानवतेसमोर असलेल्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी, मानवतेची तयारी करून घेत असतात. प्रकाशाच्या शांतीमध्ये एका वैश्विक घडामोडीद्वारे, श्रीअरविंद मानवतेच्या दृष्टिकोनाला आणि तिच्या कार्यप्रणालीला मार्गदर्शन करत असतात. मुख्य म्हणजे ते मार्गदर्शन आध्यात्मिकतेवर आधारित आहे. ज्यांचे मूळच धर्मांधता, अनावश्यक झगडे–भांडणं आणि युद्धं हे असते अशा तथाकथित छद्म–धार्मिक आंदोलनांवर ते मार्गदर्शन आधारलेले नाही.

माणसांच्या क्रौर्यामुळे हे विश्व थकून गेले आहे, सगळीकडे रक्ताचे पाट वाहताना दिसत आहेत; सर्वत्र हिंसेचे वर्चस्व दिसत आहे, इतका भयंकर विध्वंस आपण यापूर्वी कधीही पाहिलेला नाही. माणसं पशू बनली आहेत, किंबहुना ती पशुंपेक्षाही अधिक पाशवी बनली आहेत. मनुष्य जोपर्यंत स्वतःच्या चेतनेमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न करत नाही तोपर्यंत तो एक दुर्लंघ्य, ओलांडता न येण्यासारखा अडथळा आहे.

ना मनुष्य, ना असामान्य क्षमता असणाऱ्या कोणी व्यक्ती, कोणीच, याबाबत काहीही करू शकणार नाही, किंवा आसुरी शक्तीं आणि ईश्वरी शक्तीमधील दरी कोणीही भरून काढू शकणार नाही. अज्ञानाने मनुष्याला या दशेमध्ये ढकलले आहे.

पण काळजी करू नका. ज्यांच्याकडे 'नूतन जगता'च्या निर्मितीचे कार्य सोपविण्यात आले आहे, ज्यांच्यावर ती जबाबदारी देण्यात आली आहे, ते मानवाला या 'नूतन जगता'च्या सीमेपर्यंत घेऊन जाण्याचे कार्य करत आहेत; अडचणी आणि अडथळे उपटून फेकून देण्याचे कार्य ते अविरतपणे करत आहेत आणि मानवाला एका उज्ज्वल भवितव्याच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी मार्गदर्शन करत आहेत. केवळ तेच या समस्येवर उपचार करू शकतात कारण ते आपल्या अस्तित्वाचे कर्तेधर्ते आहेत. विश्वास ठेवा म्हणजे सारे काही योग्य होईल.

कदाचित, सद्यस्थितीत मानव त्याच्या पार्थिव अस्तित्वाच्या चढउतारांमध्ये, उत्क्रांतीच्या वळणावळणांच्या वाटचालीमध्ये सर्वात नीचतम पातळीवर जाऊन पोहोचला आहे. पण लवकरच, आपल्याला तो प्रकाश दिसेल, एका महान परिवर्तनाची आशा दृष्टीस पडेल, श्रीअरविंदांच्या उपस्थितीची निश्चितता हीच या पृथ्वीवर ईश्वराचे साम्राज्य अवतरित करू शकते आणि ते प्रस्थापित करू शकते.

– श्रीमाताजी (Blessings of the Grace by Mona Sarkar)

*

हे ईश्वरा, रूपांतरणाचे तुझे कार्य पूर्णत्वास न्यावे म्हणूनच आम्ही या पृथ्वीवर आहोत. तोच आमचा एकमात्र संकल्प आहे, आमची मने केवळ त्यानेच व्याप्त आहेत. तोच आमचा एकमेव उद्यम (Occupation) व्हावा आणि आमच्या सर्व कृती या एकमेवाद्वितीय अशा ध्येयाला साहाय्य करणाऱ्या ठराव्यात, असे वरदान दे.

– श्रीमाताजी (CWM 15 : 169)

*



पाँडिचेरी येथील श्रीअरविंद व श्रीमाताजी यांची समाधी

## श्रीअरविंदांची उपस्थिती

(श्रीमाताजींनी सन १९७२ साली दिलेला हा संदेश, आज सन २०२५ मध्ये म्हणजे श्रीअरविंदांच्या महासमाधीच्या पंच्याहत्तराव्या वर्षाच्या निमित्तानेही सार्थ ठरत आहे.)

श्रीअरविंदांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने लोक श्रीअरविंदांचे स्मरण करत आहेत, त्यांना आवाहन करत आहेत आणि त्यामुळे त्यांची उपस्थिती अधिक सक्रिय आणि प्रभावी झाली आहे. परंतु जे नित्य श्रीअरविंदांच्या सन्निध असतात, त्यांना ही गोष्ट काही नवीन नाही.

लोकं जेव्हा समाधीपाशी ध्यानाला बसतात तेव्हासुद्धा हीच गोष्ट घडून येत असते. वास्तविक श्रीअरविंद नेहमीच तेथे असतात, परंतु लोकं जेव्हा त्यांना आवाहन करतात, तेव्हा त्याला प्रतिसाद म्हणून श्रीअरविंदांची उपस्थिती अधिक सक्रिय होते.

– श्रीमाताजी (CWM 17 : 372)

*

**श्रीअरविंदांच्या उपस्थितीचा अनोखा अनुभव**

(१५ ऑगस्ट १९६२ रोजी सामूहिक ध्यानाच्या वेळी जो अनुभव आला त्याविषयी श्रीमाताजी येथे सांगत आहेत.)

१५ ऑगस्टला सकाळी दहा वाजता आश्रमात सामूहिक ध्यान सुरू होणार होते. पावणे दहा वाजता मी पूर्ण निश्चल–नीरव अशा अवस्थेत टेबलापाशी बसले होते. आणि तेव्हा... श्रीअरविंद आले. वास्तविक 'श्रीअरविंद आले' असे म्हणता येणार नाही, कारण ते येथे नेहमीच उपस्थित असतात. परंतु यावेळी ते एका विशेष पद्धतीने आविष्कृत झाले होते. अगदी मूर्त रूपात, सूक्ष्म शारीरिक रूपात ते आविष्कृत झाले. ते पद्मासन घालून बसले होते. ते खूप भव्य झाले होते आणि त्यांनी आश्रमाचे सारे आवार जणू व्यापून घेतले होते; किंबहुना त्यापेक्षाही थोडा अधिक परिसर त्यांनी व्यापला होता. ते अशा रितीने बसले होते की, ध्यान करणारी सगळी माणसं त्यांच्या आत सामावली होती.

सूक्ष्म शरीरातील त्यांच्या उपस्थितीची जाणीव मला होत होती. अगदी पूर्ण शारीर, मूर्त अशी ती अनुभूती होती. मी इथे टेबलापाशी बसले होते पण मी त्यांना पाहिले. तुम्हाला माहीत आहे ना की, मी फक्त या देहापुरतीच सीमित नाही.

ते तिथे बसले होते, ते खूप भव्य दिसत होते आणि त्यांचे शरीर संपूर्णपणे प्रमाणबद्ध होते. ते अगदी हळुवारपणे, अगदी हळुवारपणे अवतरित होऊ लागले. त्या अवतरणामुळे एक प्रकारचे कंपन होत होते. ध्यानस्थ बसलेल्या लोकांना धक्का पोहोचू नये अशा रितीने अगदी हळुवारपणे ते अवतरित होत होते आणि मग ते तिथे स्थिरावले.

अर्धा तास किंवा त्याहीपेक्षा काही अधिक मिनिटे ते अगदी पूर्णपणे स्तब्ध बसले होते. त्यांचे लक्ष पूर्णपणे त्या उपस्थित असलेल्या सर्व लोकांवर एकाग्र झाले होते. तिथे उपस्थित असलेले सर्व जण त्यांच्या आतमध्ये सामावले होते. मी प्रसन्नवदनाने ते सारे दृश्य पाहत होते.

आता श्रीअरविंद सर्वत्र होते. अगदी सर्वत्र होते. अत्यंत अपार शांती दाटून आली होती. इतकी शांती, इतकी शक्ती, इतकी ऊर्जा होती तिथे... आणि त्याचबरोबर एक प्रकारची शाश्वततेची, महाकाशाची, कैवल्याची जाणीवदेखील तिथे होती.

सारे काही संपन्न झाले आहे (अशा समाधानात) एखादी व्यक्ती शाश्वततेमध्ये जीवन जगत असावी, तशा प्रकारची ती कैवल्याची जाणीव होती. काही वेळाने ते अंतर्धान पावले. ते अगदी शांतपणे, शांतपणे, शांतपणे अंतर्धान पावले. ते जणू वाफेप्रमाणे हळूहळू दिसेनासे झाले आणि मग गोष्टी पुन्हा एकदा पूर्वपदावर आल्या.

मला वाटते, काही लोकांना तरी ही गोष्ट निश्चितपणे जाणवली असणार. त्यांच्यापाशी ती विशिष्ट दृष्टी नसल्यामुळे, कदाचित त्यांना त्याचा अर्थ उलगडला नसेल पण श्रीअरविंदांचे आपल्यामध्ये अवतरण होत आहे, हे त्यांना जाणवले असणार. अर्थात श्रीअरविंद इथे नेहमीच उपस्थित असतात, पण आज सकाळी ध्यानाच्या वेळी ते जसे उपस्थित होते तसे ते आता नव्हते. कारण दुपारी, पुन्हा जेव्हा गोष्टी पूर्वपदावर आल्या होत्या, तेव्हा वातावरणात एक प्रकारची हुरहुर होती. जणूकाही कोणीतरी म्हणत होते, ''१५ ऑगस्टचा कार्यक्रम पार पडला पण त्याबरोबर तो मंगलमय अनुभवदेखील नाहीसा झाला आहे.''

मी वर्णन केलं त्याप्रमाणे ती उपस्थिती अगदी मूर्त, सघन होती. ती कशी होती त्याचे वर्णन करण्यासाठी शब्द अपुरे आहेत. पण त्यामध्ये कैवल्याची जाणीव होती. मी त्यांना नेहमी त्यांच्या अतिमानसिक प्रकाशात पाहत असे. मी जेव्हा बाल्कनीमध्ये दर्शनासाठी जात असे तेव्हा ते बरेचदा उपस्थित राहात असत. कधीकधी ते समाधीच्या वर उपस्थित असत. ते बरेचदा येत असत.

परंतु या वेळच्या १५ ऑगस्टचे त्यांचे दर्शन काही निराळेच होते. पहिली गोष्ट म्हणजे त्यांचे रूप खूप भव्य होते. त्यांनी संपूर्ण आवाराला

जणू काही कवळून घेतले होते. ते अशा रितीने आले होते की, अगदी मूर्त रूपात त्यांची जाणीव होत होती. आणि त्यामध्ये इतका विश्वास, इतका हर्ष, इतकी खात्री होती की, जणूकाही सर्व कार्याची परिपूर्ती झाली असावी, अशा प्रकारची एक खात्री, निश्चितता तिथे होती. काही कार्य करायचे बाकी राहिले आहे, या जाणिवेतून जो एक प्रकारचा ताण येतो, तसा तो तिथे अजिबात नव्हता. सुमारे पाऊण तासपर्यंत हा अनुभव टिकून होता आणि नंतर गोष्टी पुन्हा पूर्वपदावर आल्या.

आजवर अनुभवलेल्या १५ ऑगस्टच्या अनुभवांपैकी हा सर्वात सुंदर दिवस होता.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple, Aug 18, 1962)

*

## श्रीअरविंदांचे मार्गदर्शन

श्रीमाताजी : तुम्हाला जर कोणती एखादी गोष्ट यातना देत असेल किंवा तुम्ही अडचणीत असाल आणि काय करावे ते तुम्हाला समजत नसेल तर लगेच स्वतःला शांत करा आणि अंतरंगामध्ये प्रवेश करा. तुमच्या आंतरिक अस्तित्वाला म्हणजे, तुमच्या चैत्य पुरुषाला (psychic being) प्रामाणिकपणे विचारा म्हणजे मग तुम्हाला उत्तर मिळेल. हे उत्तर अगदी स्पष्ट व नेमके असेल आणि ते अगदी चुटकीसरशी मिळेल. तुम्ही काय केले पाहिजे हे त्या उत्तरातून तुम्हाला समजेल. चैत्य पुरूष तुम्हाला निरपवादपणे मार्गदर्शन करेल...

दुसराही एक मार्ग आहे आणि तो सुद्धा खूप परिणामकारक आहे. जेव्हा जेव्हा तुम्ही मार्गदर्शन मागाल तेव्हा तेव्हा प्रत्येक वेळी तुम्हाला ते लाभेलच.

समजा तुम्ही अडचणीत असाल किंवा समजा तुम्हाला एखादे उत्तर हवे आहे किंवा तुम्हाला काहीशी बेचैनी जाणवत असेल किंवा एखाद्या गोष्टीमुळे तुम्ही त्रस्त झाला असाल किंवा तुमच्या हातून एखादी चूक

घडली असेल आणि त्यामुळे तुम्ही अस्वस्थ असाल, समजा तुम्ही खूप चिडले असाल, वैतागलेले असाल, ती गोष्ट भलेही अगदी किरकोळ असेल, अगदी सामान्य असेल, त्याला फारशी काही किंमत नसेल किंवा ज्याचे काही कारण कळत नाही अशा काही गोष्टीसुद्धा असू शकतील, गोष्टी जशा असायला पाहिजेत तशा नसतील, अशा वेळी तुम्हाला त्या असुखद दशेमधून सुटका करून घ्यायची असेल तर तुम्ही थेट समाधीपाशी या आणि तुमचे डोकं समाधीवर टेकवा आणि तुम्हाला जे काही सांगायचे आहे, ते विनासंकोच, निःशंकपणे, मोकळेपणाने श्रीअरविंदांना सांगा. तुम्ही जसे मला सांगायला येता, तसे त्यांना सांगा.

माझ्याशी बोलल्या–बोलल्या लगेचच तुमच्या अडचणी क्षणार्धात नाहीशा झालेल्या आहेत, पूर्णपणे नाहीशा झालेल्या आहेत, असे तुम्हाला अनेकदा आढळले आहे. मी तुमच्यामधून त्या अडचणींना पळवून लावले होते म्हणून तुमची त्या अडचणींपासून सुटका झाली होती. त्या नकारार्थी किंवा कधीकधी तर अगदी घातक अशा कल्पनाजन्य रचनांपासून तुम्ही मुक्त झाला आहात आणि तुम्हाला अगदी हलके, मोकळे वाटत आहे, असा अनुभव तुम्ही घेतला आहे. याचे कारण असे की, मी ते ओझे तुमच्यामधून काढून टाकले होते आणि त्यामुळे तुम्ही आनंदाने घरी गेला होतात. आठवते का? अशा प्रकारचा तुमचा अनुभव तुम्ही मला अनेकदा सांगितला आहे.

साधक : हो माताजी, बरेचदा असे झाले आहे.

श्रीमाताजी : अगदी तशाच पद्धतीने तुम्ही श्रीअरविंदांना सांगा. तुम्ही तुमचे डोकं समाधीवर टेकवा आणि तुम्हाला तुमच्या अडचणींमधून बाहेर काढावे अशी त्यांना विनंती करा किंवा मग तुम्ही अंतःकरणपूर्वक प्रार्थना करा, पण ती अत्यंत प्रामाणिकपणे केली पाहिजे. प्रार्थना करताना तुमच्या अस्तित्वाच्या अगदी खोलवर तुमचे अवधान तुम्ही केंद्रित केले पाहिजे. मला खात्री आहे की, श्रीअरविंद तुमचे म्हणणे ऐकतील आणि

तुम्हाला उत्तर देतील. निःसंशयपणे, तुम्ही आता त्यांच्याबरोबर अगदी सहजतेने संवाद साधू शकाल. बऱ्याच जणांना असा अनुभव आला आहे आणि त्यांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. आपण आता अधिक सुगम रितीने श्रीअरविंदांपर्यंत पोहोचू शकतो आणि तेदेखील आता अधिक सक्रिय झाले आहेत.

असे केलेत तर, तुम्हाला वाटही पाहावी लागणार नाही. आधी कसे होते की, तुम्ही मला कळवणार, मग मी सोयीची तारीख, वेळ पाहून तुम्हाला कळवणार, तुम्हाला मला जे सांगायचे आहे ते ऐकण्यासाठी मला पुरेसा वेळ आहे की नाही ते पाहणार आणि मग मी तुम्हाला उत्तर देणार. एक उत्तर मिळण्यासाठी हे एवढे सगळे तुम्हाला करावे लागत असे. त्याला खूप वेळ लागतो, ती प्रक्रिया खूपच वेळखाऊ आहे आणि मुख्य म्हणजे, वाट पाहण्यासाठी आवश्यक असणारा धीर तुमच्याकडे असला पाहिजे.

...पण आता ही पद्धत अधिक सोयीस्कर झाली आहे, अधिक थेट झाली आहे आणि अधिक सुगम झाली आहे. तुम्ही त्यांना कोणत्याही वेळी विचारू शकता. तुम्हाला उत्तर हवे असेल तेव्हा तुम्हाला फक्त समाधीपाशी यायचे आहे. समजा एखादी गोष्ट बरोबर चालली नाहीये आणि तुम्हाला त्याचे कारण जाणून घ्यायचे आहे किंवा तुम्हाला तुमच्यामधील एखाद्या दुर्बलतेवर मात करायची आहे किंवा तुम्हाला बरे व्हायचे आहे किंवा तुमचे शुद्धीकरण करून घ्यायचे आहे किंवा तुमचे शुद्धीकरण व्हावे म्हणून तुमच्यामधील एखादी अडचण तुम्हाला दूर करायची आहे, अशा कोणत्याही प्रश्नासाठी तुम्ही या आणि समाधीपाशी येऊन श्रीअरविंदांना विचारा, तुम्हाला तुमचे उत्तर नक्की मिळेल. आणि केवळ उत्तरच मिळेल असे नाही तर, तुम्हाला त्यांचे आशीर्वाद, त्यांची करुणा, त्यांची शांती आणि त्यांचे प्रदीपनदेखील लाभेल. त्यांचे सर्व-शक्तिमान प्रेम तुम्हाला कवळून घेईल.

एकदा का तुम्ही त्यांच्या हाती स्वतःला सोपविलेत की, सर्व

संकटांपासून तुमचे संरक्षण होईल; असा हा त्यांचा प्रभाव आहे.

जे कोणी अगदी साधेसरळ, निष्कपट आहेत, प्रामाणिक आणि विनम्र आहेत त्यांच्यासमोर ते स्वतःला प्रकट करतात. ते तिथे आहेत, अगदी पूर्ण सचेत आहेत आणि तेथून ते जगातील घटनांना निर्देश देत असतात. मला जेव्हा काही जाणून घेण्याची आवश्यकता असते तेव्हा मी त्यांना विचारते आणि ते मला लगेचच उत्तर देतात.

श्रीअरविंद जेव्हा देहामध्ये होते, तेव्हा लोकं म्हणत असत की, ते खूप दूरस्थ आहेत आणि माणसांना त्यांच्यापर्यंत पोहोचता येत नाही. इथल्या साधकांच्या जीवनातील घडामोडींविषयी श्रीअरविंदांना काही पर्वा नाही, असे लोकांना वाटत असे. पण हे खरे नव्हते, कारण या जगाला उन्नत करून, त्याला अतिमानसिक जगाच्या आगमनासाठी तयार करण्याचे त्यांचे स्वतःचे महत्कार्य बाजूला ठेवून, श्रीअरविंद साधकांच्या पत्रांना उत्तरे लिहिण्यामध्ये रात्रींमागून रात्री व्यतीत करत असत. साधकांच्या प्रश्नांची चिंता वाहण्यात ते स्वतः निमग्न असत आणि साधकांची प्रगती व्हावी म्हणून ते अपार कष्ट उपसत असत.

असे असूनसुद्धा, साधक माझ्याशी थेटपणे संपर्क साधू शकतील, माझे आशीर्वाद प्राप्त करून घेऊ शकतील आणि भौतिक स्तरावर व्यवहारामध्ये त्याचप्रमाणे साधनेसाठी आंतरिकरित्या माझे साहाय्य प्राप्त करून घेऊ शकतील अशी व्यवस्था त्यांनी निर्माण केली होती. माझ्या माध्यमातून साधक कोणत्याही अडचणीवर मात करू शकत असत किंवा अतिमानसाच्या दिशेने जाणाऱ्या चेतनेच्या उच्चतम स्तरांची अनुभूती घेऊ शकत असत.

त्या काळी अतिमानसाच्या दिशेने जो शोध चाललेला होता त्याला विरोध करणाऱ्या आणि आमच्या कार्यामध्ये अडथळा बनून समोर उभ्या ठाकणाऱ्या विविध शक्तींवर आणि चेतनेच्या अगणित अवस्थांवर, विविध जगतांवर नियंत्रण मिळविण्यामध्ये, म्हणजे त्यांच्यावर केवळ विजय

मिळविण्यामध्येच नव्हे तर, त्यांना पराभूत करण्यामध्ये आणि त्यांच्यावर प्रभुत्व मिळविण्यामध्ये श्रीअरविंद गढलेले होते. सगळ्या बारीकसारीक दैनंदिन गोष्टी आणि आश्रमाचा सगळा कारभार त्यांनी माझ्यावर सोपविला होता. साधकांच्या व्यक्तिगत प्रगतीची तसेच सामूहिक योगाच्या दिशेने जे प्रयत्न करायचे त्या सर्व गोष्टींची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. त्या काळामध्ये श्रीअरविंदांना लोकांच्या तक्रारी ऐकायला किंवा त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायला क्वचितच वेळ मिळत असे.

पण आता त्यांनी स्वतःला वैश्विक केले आहे, ते विशाल झाले आहेत आणि आता ते अधिक निकट, जवळ आले आहेत. त्या निकटतेच्या माध्यमातून आणि त्यांच्या थेट प्रभावातून आता त्यांचा प्रत्येकाशी एक धागा जुळला आहे आणि त्यामुळे प्रत्येकालाच त्यांच्यापर्यंत पोहोचता येणे शक्य झाले आहे.

– श्रीमाताजी (Blessings of the Grace by Mona Sarkar)

*


(एके दिवशी श्रीअरविंदांच्या समाधीकडे पाहत असताना श्रीमाताजींनी एक प्रार्थनारूपी भाव व्यक्त केला होता...)

माझे पूजन व्हावे हे मला अभिप्रेत नाही. मी येथे कार्य करण्यासाठी आले आहे, पूजन करून घेण्यासाठी नव्हे. लोकांच्या हृदयाला संतोष व्हावा म्हणून त्यांना तुमची (श्रीअरविंदांची) पूजाअर्चना करू दे. माझे कार्य अबाधितपणे करता यावे म्हणून मला मात्र नि:शब्द, मौन, (hidden) प्रच्छन्न भावामध्ये राहू देत आणि त्यासाठी सर्व आवरणांपैकी सर्वोत्तम आवरण म्हणजे हे शरीर!

– श्रीमाताजी (CWM 13 : 46)

**

वाचक अंकाविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया
editorabhipsa2018@gmail.com या ईमेलवर कळवू शकतात.




# सावित्री महाकाव्याची थोरवी

## सावित्री म्हणजे...

'सावित्री' हे महाकाव्य श्रीअरविंदांच्या दिव्य दृष्टीचे अत्युच्च प्रकटीकरण आहे. हे महाकाव्य म्हणजे, ज्यांनी ते लिहिले आहे त्या श्रीअरविंदांच्या आध्यात्मिक अनुभूतींची दैनंदिन नोंद आहे. ज्यांना पूर्णयोगाची साधना करायची आहे त्यांच्यासाठी मार्गदर्शक ठरू शकेल अशी योगाची एक समग्र प्रणाली म्हणजे सावित्री. सावित्री म्हणजे पृथ्वीचा ईश्वराप्रत चाललेल्या आरोहणाचा योग! दिव्य माता पृथ्वीवर अवतरली आहे. पृथ्वीवरील फसवेगिरी आणि अज्ञान यांच्याशी दोन हात करण्यासाठी, तिने (स्वतःचा दिव्य देह बाजूला ठेवून,) मानवी देह धारण केला आहे; त्या देहाशी जुळवून घेण्यासाठी ती जे अपार कष्ट सोसत आहे ते सर्व अनुभव सावित्रीमध्ये ग्रथित करण्यात आले आहेत.

– श्रीमाताजी (CWM 13 : 24)

*

**सावित्री आणि समस्यानिरसन**

तुम्ही जर कधी निराश असाल किंवा दुःखीकष्टी असाल किंवा तुम्ही कितीही प्रयत्न केलेत तरी, तुम्ही जे काही करू पाहत आहात त्यात जर तुम्ही यशस्वी झाला नाहीत किंवा तुम्हाला ज्याची अपेक्षा आहे त्याच्यापेक्षा काहीतरी विपरीत असेच जर नेहमी घडत असेल आणि आता ते अशा एका टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले असेल की जेथे तुमचा तुमच्यावरचा ताबा सुटतो, जीवन तिरस्करणीय होऊन जाते, तुम्ही दुःखीकष्टी होता तेव्हा लगेचच 'सावित्री' महाकाव्य हाती घ्या आणि एक क्षणभर चित्त एकाग्र करून, त्यातील कोणतेही एक पान उघडा आणि वाचा. तुमचे सगळे दुःख वाफेप्रमाणे विरून जात आहे, असे तुम्हाला आढळेल. अगदी कितीही पराकोटीचे दुःख असले तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य त्यातून तुम्हाला मिळेल. आत्तापर्यंत जे तुम्हाला त्रासदायक वाटत होते ते आता तसे वाटेनासे होईल. उलट, त्याऐवजी तुम्हाला विलक्षण आनंद जाणवू लागेल. जणूकाही या जगात अशक्य असे काही नाहीच असे तुम्हाला वाटेल आणि प्रत्येक अडथळ्यावर मात करण्यासाठी आवश्यक असणारी शक्ती व ऊर्जा तुम्हाला लाभेल; तुमच्या चेतनेमध्ये पूर्णपणे पालट झालेला असेल. सर्व गोष्टींचे शुद्धीकरण करणारा एक अक्षय आनंद तुमच्या अनुभवास येईल. सावित्रीमधील अगदी थोड्या पंक्ती वाचल्यात तरीही त्यामुळे तुमचा तुमच्या आंतरतम अस्तित्वाशी संपर्क घडून येईल. वाचून झाल्यावर तुम्ही अगदी खूप गाढपणे एकाग्र झालात तरीदेखील, तुम्हाला भेडसावणाऱ्या गोष्टीवर तुम्हाला उपाय सापडेल. तुम्ही कोणताही विचार न करता, सावित्रीमधील अधलेमधले कोणतेही पान उघडा, तेथे तुम्हाला तुमच्या समस्यांचे उत्तर सापडेल. अगदी साधेसरळपणाने आणि श्रद्धेने हे केलेत तर तुम्हाला याचा परिणाम निश्चितपणे दिसून येईल.

– श्रीमाताजी (Sweet Mother by Mona Sarkar : 40-41)

*

## सावित्रीचे आकलन

तुम्हाला 'सावित्री' महाकाव्य उमगते की नाही, समजते की नाही यामुळे फारसा काही फरक पडत नाही; सावित्रीचे वाचन नेहमी करत राहा. जेव्हा जेव्हा तुम्ही सावित्रीचे वाचन कराल त्या प्रत्येक वेळी तुम्हाला त्यातून काहीतरी नवीन उमगते आहे, असे आढळून येईल. प्रत्येक वेळी तुम्हाला एक नवीनच दर्शन घडेल, प्रत्येक वेळी एक नवीनच अनुभव तुम्हाला येईल, ज्या गोष्टी आधी तिथे नव्हत्या किंवा तुम्हाला ज्या गोष्टी आधी समजल्या नव्हत्या, त्या गोष्टी उदयाला येतील आणि अचानकपणे साऱ्या गोष्टी सुस्पष्ट होतील. सावित्रीच्या शब्दांच्या किंवा काव्यपंक्तींच्या माध्यमातून, नेहमीच एक अनपेक्षित दृष्टी उदयाला येते. जेव्हा जेव्हा तुम्ही सावित्रीचे वाचन कराल आणि समजून घेण्याचा प्रयत्न कराल, त्या प्रत्येक वेळी, कोणत्यातरी गोष्टीची भर घातली गेलेली आहे, असे तुम्हाला आढळेल. जे सुप्त होते त्याचे अगदी स्पष्टपणे आणि तपशिलवार प्रकटन झाले आहे असे तुम्हाला जाणवेल. ज्या काव्यपंक्तीचे तुम्ही आधी एकदा वाचन केले होते त्याच जेव्हा तुम्ही पुन्हा वाचाल, तेव्हा त्या प्रत्येक पुनर्वाचनाच्या वेळी त्याच काव्यपंक्ती एका वेगळ्या प्रकाशात तुमच्या समोर प्रकट होतील. हे असे अगदी नेहमी घडून येते. नेहमीच तुमचा अनुभव अधिकाधिक समृद्ध होत जातो, प्रत्येक टप्प्यावर घडून आलेला तो एक साक्षात्कार असतो.

परंतु अवांतर पुस्तकं किंवा वर्तमानपत्रं वाचल्याप्रमाणे तुम्ही सावित्रीचे वाचन करता कामा नये. तुम्ही सावित्रीचे वाचन रिक्त डोक्याने केले पाहिजे, मनाची पाटी कोरी करून वाचन केले पाहिजे, म्हणजे मनामध्ये इतर कोणतेही विचार असता कामा नयेत; तुम्ही लक्ष एकाग्र केले पाहिजे आणि रिक्त, स्थिरचित्त व खुले राहिले पाहिजे; असे केलेत तर सावित्रीमधील शब्द, लय, स्पंदने या पांढऱ्या कागदावर

थेटपणे उतरतील आणि तुमच्या मेंदूवर त्याचा ठसा उमटवतील आणि सावित्रीमधील ते शब्द, ती लय, ती स्पंदने स्वतःहूनच तुम्हाला त्यांचा अर्थ उलगडवून दाखवतील आणि त्यानंतर अगदी विनासायास तुम्हाला त्यांचा अर्थ स्पष्ट होईल.

## सावित्रीचे साहाय्य

तुम्हाला (अध्यात्माच्या) सर्वोच्च शिखरापर्यंत नेण्यासाठी 'सावित्री' हे महाकाव्यच पुरेसे आहे. त्यावर ध्यान कसे करायचे हे जर एखाद्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने माहीत असेल तर, आवश्यक असणारे सर्व प्रकारचे साहाय्य त्या व्यक्तीला सावित्रीमधून मिळेल. त्या व्यक्तीला जर खरोखरच (पूर्णयोगाच्या) या मार्गाचे अनुसरण करण्याची इच्छा असेल तर, सावित्री हे महाकाव्य म्हणजे जणू एक दृग्गोचर (visible) असे साहाय्य आहे, जणूकाही ईश्वर स्वतःच त्या व्यक्तीस हाताला धरून चालवितो आणि निर्धारित उद्दिष्टाप्रत घेऊन जातो. आणि मग, एखादा प्रश्न, मग तो कितीही वैयक्तिक असला तरी, त्या प्रश्नाचे उत्तर त्यामध्ये सापडते, प्रत्येक समस्येचे त्यामध्ये निरसन होते; खरोखरच, व्यक्तीला योगसाधना करण्यासाठी आवश्यक असणारी प्रत्येक गोष्ट त्यामध्ये मिळते.

''जणूकाही श्रीअरविंदांनी समग्र विश्वच या एका ग्रंथामध्ये सामावून घेतले आहे.'' हे एक अद्‌भुत कार्य आहे, ते भव्य आहे आणि ज्याची तुलनाच होऊ शकणार नाही अशा अद्वितीय पूर्णत्वाने घडलेले हे कार्य आहे.

## सावित्री : एक साहस

सावित्रीच्या लिखाणापूर्वी एकदा श्रीअरविंद मला म्हणाले, ''एका नवीन साहसाला आरंभ करण्यासाठी मला प्रवृत्त केले जात आहे, सुरुवातीला मी संकोच बाळगत होतो, पण आता मी निर्णय घेतला आहे. तरीसुद्धा, यामध्ये मी कितपत यशस्वी होईन हे मला माहीत नाही. पण त्यासाठी साहाय्य मिळावे म्हणून मी प्रार्थना करत आहे.'' ही गोष्ट

लिखाण सुरू करायच्या आधीची आहे. त्यांचे बोलणे ईश्वरी विनम्रतेने आणि सौजन्याने भरलेले असे. श्रीअरविंदांच्या बोलण्याची पद्धतच तशी होती; त्यांनी कधीच... स्वतःला महत्त्व दिले नाही.

ज्या दिवशी त्यांनी खरोखरच लेखनास प्रारंभ केला तेव्हा ते मला म्हणाले, ''सुकाणू नसलेल्या नावेत बसून, मी स्वतःला अनंताच्या विशालतेमध्ये झोकून दिले आहे.'' आणि एकदा सुरुवात झाल्यानंतर मात्र ते पानांमागून पाने अविरतपणे लिहीत गेले, जणूकाही ते लेखन आधीच अवकाशात वर कोठेतरी पूर्ण झालेले होते आणि त्यांना ते या पानांवर लेखणीच्या साहाय्याने फक्त उतरवून काढायचे होते.

खरे सांगायचे तर, सावित्रीची पूर्ण रचनाच उच्चतर प्रांतामधून, 'एकसंधपणे' अवतरली आहे आणि श्रीअरविंदांनी त्यांच्या अलौकिक प्रतिभेच्या आधारे, अगदी दिमाखदार आणि भव्य शैलीच्या माध्यमातून, त्यातील काव्यंपक्तींची मांडणी केली आहे. कधीकधी तर ओळीमागून ओळी त्यांच्यासमोर सुस्पष्टपणे प्रकट झाल्या आहेत आणि त्यांनी त्या जशाच्या तशा उतरवून घेतल्या आहेत; शक्यतेच्या सर्वोच्च शिखरावरून प्रेरणा यावी म्हणून त्यांनी अथकपणे, अविरतपणे परिश्रम घेतले आहेत. त्यांनी केवढे महान कार्य केले आहे!

'सावित्री' ही खरंच, स्वयमेव एक सत्य निर्मिती आहे. या कार्याची इतर कशाबरोबर तुलनाच होऊ शकत नाही. त्यामध्ये प्रत्येक गोष्ट आहे आणि त्या गोष्टी त्यामध्ये अतिशय साध्यासोप्या व सुस्पष्ट रूपात मांडल्या आहेत; त्यातील वचने ही अगदी पूर्णतया सुसंवादी, पारदर्शी आणि शाश्वत सत्य आहेत.

## अद्वितीय सावित्री

आजवर मी प्रचंड वाचन केले आहे, पण 'सावित्री'बरोबर तुलना होऊ शकेल अशी एकही साहित्यकृती मला आढळलेली नाही. ग्रीक, लॅटिन, इंग्रजी आणि अर्थातच फ्रेंच साहित्यामधील उत्तमोत्तम साहित्यकृती

मी अभ्यासलेल्या आहेत, जर्मन भाषेतील साहित्यकृतीसुद्धा मी वाचल्या आहेत; इतकेच नव्हे तर, पाश्चात्त्य आणि पौर्वात्य देशांमधील महाकाव्यांसहित, उत्तमोत्तम असे सर्व साहित्य मी अभ्यासले आहे. पण मी पुन्हा सांगते की, 'सावित्री'च्या तोडीचे साहित्य मला कुठेच, कधीच आढळलेले नाही. काही अगदी मोजक्या साहित्यकृतींचा अपवाद वगळता, 'सावित्री'व्यतिरिक्त इतर साहित्यकृती मला अगदी पोकळ, सपाट, रित्यारित्या वाटल्या, त्यामध्ये कोणताही तथ्यांशच नव्हता. आणि त्या मोजक्या साहित्यकृतीसुद्धा सावित्रीच्या तुलनेत अगदी एखादा अंशभागच आहेत असे म्हणावे लागेल. 'सावित्री'ची भव्यता, तिची विशालता, त्यामधील सत्य यांविषयी काय वर्णावे? श्रीअरविंदांनी खरोखरच अजरामर आणि चिरंतन असे साहित्य निर्माण केले आहे. मी पुन्हा एकदा सांगते की, सावित्रीसारखे महाकाव्य अन्यत्र कोठेही आढळणार नाही.

एखाद्या व्यक्तीने अगदी त्यातील सत्यतेची दृष्टी जरी बाजूला ठेवली, वास्तविक, ती दृष्टी हाच त्यातील प्रेरणेचा गाभा आहे, तेच त्याचे मूलद्रव्य आहे; पण ते बाजूला ठेवून जरी फक्त त्यातील केवळ काव्यपंक्तींचाच विचार केला तरी, त्यासुद्धा एकमेवाद्वितीय म्हणाव्यात अशाच असल्याचे त्या व्यक्तीला आढळेल. अभिजात साहित्यकृतींमधील सर्वोच्च अशा त्या आहेत, असे त्या व्यक्तीच्या लक्षात येईल. मनुष्य ज्याची कल्पनाही करू शकणार नाही अशी ही श्रीअरविंदांची निर्मिती आहे. कारण त्यामध्ये सारे काही आहे, सारे सारे आहे.

### सावित्री ग्रंथ : अमर्त्यत्वाचा मार्गदर्शक

'सावित्री' महाकाव्य म्हणजे एक साक्षात्कार आहे, तेच ध्यान आहे, 'सावित्री' हा अनंताचा, शाश्वताचा शोध आहे, असे म्हणता येईल.

'सावित्री' हे महाकाव्य जर अमर्त्यत्वाची आस बाळगून वाचले तर, सावित्रीचे वाचन हेच स्वयमेव अमर्त्यतेचे मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरेल. सावित्रीचे वाचन करणे म्हणजे खरेतर योगसाधना करण्यासारखेच

आहे, आध्यात्मिक ध्यान करण्यासारखे आहे; ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठी जे जे काही आवश्यक असते ते ते सारे व्यक्तीला यामध्ये आढळणार आहे.

येथे योगाच्या प्रत्येक टप्प्याची नोंद करण्यात आलेली आहे. एवढेच नव्हे तर, इतर सर्व योगांमधील रहस्यांचीसुद्धा येथे नोंद आहे. यातल्या प्रत्येक वचनामध्ये जे प्रकटीकरण झाले आहे त्याचे एखाद्या व्यक्तीने जर खरोखरच प्रामाणिकपणे अनुसरण केले तर, ती व्यक्ती अंतिमतः अतिमानसिक योगातील रूपांतरण–प्रक्रियेपर्यंत येऊन पोहोचेल. सावित्री हे महाकाव्य म्हणजे असा एक अचूक मार्गदर्शक आहे की जो तुमची साथसंगत कधीही सोडत नाही. जो कोणी या योगमार्गाचे अनुसरण करू इच्छितो, त्याला नेहमीच सावित्रीचे साहाय्य उपलब्ध असते.

**सावित्री : सत्यशोधनाची गुरुकिल्ली**

'सावित्री'मधील एकेक वचन हे एखाद्या प्रकट मंत्रासारखे आहे; ज्ञानाच्या मार्गाने मानवाने जे जे काही प्राप्त करून घेतले आहे त्याच्या पलीकडे जाणारे असे एकेक वचन आहे. यातील शब्दांचे प्रकटीकरण व रचना अशा पद्धतीने केली आहे की, त्याच्या लयीची नादात्मकता तुम्हाला ध्वनीच्या उगमापाशी म्हणजे ॐकारापाशी घेऊन जाते, हे मी पुन्हा एकदा सांगते.

होय, सारे काही त्यामध्ये आहे : त्यामध्ये पारलौकिक गुह्यज्ञान आहे, गूढशक्तिवाद आहे, तत्त्वज्ञान आहे, उत्क्रांतीचा इतिहास आहे; त्यामध्ये मानवाचा, देवांचा, निर्मितीचा आणि प्रकृतीचा इतिहास आहे. या विश्वाची निर्मिती कशी झाली, का झाली, त्याचे प्रयोजन काय होते, त्याचे भवितव्य काय असणार आहे, हे सारे सारे त्यामध्ये ग्रथित केलेले आहे. तुम्हाला त्यामध्ये तुमच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. त्यामध्ये प्रत्येक गोष्टीचे अगदी खुलासेवार स्पष्टीकरण करण्यात आले आहे. जे आजवर कोणालाही ज्ञात नव्हते, असे मानवाचे आणि उत्क्रांतीचे

भवितव्यसुद्धा त्यामध्ये उलगडवून दाखविण्यात आले आहे. श्रीअरविंदांनी ते इतक्या सुंदर आणि सुस्पष्ट शब्दांमध्ये मांडले आहे की, जेणेकरून, या विश्वाचे रहस्य उलगडू इच्छिणाऱ्या, आध्यात्मिक साहसवीरांना ते रहस्य अधिक सुलभतेने आकलन होईल. परंतु हे रहस्य त्यातील ओळींच्या मागे दडलेले आहे आणि ते रहस्य शोधून काढायचे असेल तर, व्यक्तीने खऱ्या चेतनेच्या आवश्यक त्या स्तराप्रत उन्नत होणे आवश्यक आहे.

सारी भाकितं, भविष्यामध्ये जे येऊ घातलेले आहे त्या साऱ्याचे येथे अगदी अचूकपणे आणि अद्‌भुतरित्या सुस्पष्टपणे सादरीकरण करण्यात आलेले आहे. श्रीअरविंद येथे सत्यशोधनाची, चेतनेच्या शोधाची आणि हे विश्व काय आहे या समस्येचे निराकरण करण्याची एक गुरुकिल्लीच तुमच्या हाती देतात.

**सावित्री महाकाव्य : पूर्णयोगाचा सांगाती**

श्रीअरविंदांनी अचेतनतेचा दरवाजा कसा उघडला, एवढेच नव्हे तर, चेतनेचा प्रकाश अचेतनतेमध्ये खोलवर शिरून तिचे रूपांतरण तो कसे घडवून आणू शकेल त्याचासुद्धा निर्देश श्रीअरविंदांनी केला आहे. स्वतःला अज्ञानापासून कसे मुक्त करावे आणि अतिचेतनेमध्ये उन्नत कसे व्हावे, याचा मार्ग त्यांनी दाखविला आहे; त्यांनी चेतनेचा प्रत्येक स्तर, चेतनेचा प्रत्येक टप्पा दाखविला आहे, त्याचे मोजमाप कसे करता येऊ शकेल; इतकेच नव्हे तर, एखादी व्यक्ती मृत्युचा अडसर ओलांडून पलीकडे कशी जाऊ शकते आणि अमर्त्यत्व कसे प्राप्त करून घेऊ शकते, याचा मार्गदेखील त्यांनी दाखविला आहे. यामध्ये संपूर्ण प्रवासाचे तपशिलवार वर्णन तुम्हाला आढळेल आणि जसजसे तुम्ही अधिकाधिक पुढे वाटचाल कराल, तसतशा मानवाला आजवर सर्वथा अज्ञात असलेल्या गोष्टीसुद्धा तुम्हाला गवसू लागतील. हे सारे म्हणजे 'सावित्री'! आणि अजूनही कितीतरी अधिक असे त्या ग्रंथामध्ये आहे.

'सावित्री'चे वाचन ही खरोखर एक अनुभूती आहे. मानवाला

आजवर गवसलेली रहस्यं, त्याने उघड केलेली रहस्यं, तसेच भविष्यामध्ये त्याच्यासाठी खोळंबून असलेली रहस्यं, अशी सारी सारी रहस्यं या महाकाव्याच्या खोलात शिरल्यावर तुम्हाला आढळतील. परंतु व्यक्तीला हे सारे कसे शोधायचे याचे ज्ञान अवगत असले पाहिजे. चेतनेच्या स्तरांचा अनुभव, अतिमानसाचा अनुभव, एवढेच काय पण मृत्युवर विजय मिळविण्याचा अनुभवही त्याच्या गाठीशी असला पाहिजे. पूर्णयोगामध्ये पूर्णत्वाने प्रगत होता यावे या दृष्टीने श्रीअरविंदांनी यामध्ये प्रत्येक टप्प्याची, प्रत्येक पायरीची नोंद केली आहे.

**स्वानुभवाधारित महाकाव्य : सावित्री**

हा सारा श्रीअरविंदांचा स्वानुभव आहे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तोच माझा स्वतःचाही अनुभव आहे. एक प्रकारे त्यांनी येथे माझ्याकडून घडलेल्या साधनेचेच वर्णन केले आहे. यामधील प्रत्येक वस्तू, प्रत्येक घटना, प्रत्येक साक्षात्कार, सर्व वर्णनं, एवढेच काय अगदी रंगसंगतीसुद्धा मी जशी पाहिली होती तशीच आहे; यातील शब्द आणि वाक्प्रचारसुद्धा मी जसे ऐकले होते तंतोतंत, अगदी तसेच उतरले आहेत. आणि हे सारे, मी 'सावित्री' वाचण्यापूर्वी घडून आलेले होते. नंतर मी 'सावित्री'चे वाचन अनेक वेळा केले. पूर्वी जेव्हा श्रीअरविंद हे लिखाण करत असत तेव्हा मला ते वाचून दाखवीत असत.

रोज सकाळी ते मला 'सावित्री' वाचून दाखवीत असत. रात्रीच्या प्रहरी ते लिखाण करत असत आणि सकाळी मला वाचून दाखवीत असत. तेव्हा मला एक आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली. ती अशी की, रोजच्या रोज सकाळी जे जे अनुभव ते मला वाचून दाखवीत असत, आदल्या रात्री अगदी शब्दशः तसेच अनुभव मला आलेले असत. हो, सर्व वर्णनं, सर्व रंगसंगती, सर्व चित्रं अगदी मी जशी पाहिली होती तशीच, शब्द मी ऐकले होते तसेच, सारे सारे, जे मी ऐकले होते तेच त्यांनी काव्यामध्ये, या अद्‌भुत काव्यरचनेमध्ये उतरविलेले असे. हो, आदल्या रात्री जे

अनुभव मला आलेले असत, अगदी तंतोतंत तेच अनुभव दुसऱ्या दिवशी सकाळी ते मला वाचून दाखवीत असत. आणि हे काही एखाद्या दिवशी योगायोगाने घडून आलेले नव्हते, तर कित्येक दिवस हे असेच चालू होते. प्रत्येक वेळी ते जे काही सांगत असत त्याची पडताळणी मी माझ्या अनुभवांशी करून पाहत असे आणि ते अनुभव नेहमीच सारखे असत. मी परत एकदा सांगते की, मी त्यांना माझे अनुभव कथन करत असे आणि मग श्रीअरविंद त्या अनुभवांच्या नोंदी करत असत, असे नव्हते, तर मी जे काही पाहिलेले असे ते त्यांना अगोदरपासूनच माहीत असे. जणूकाही मला येणारे अनुभवच त्यांनी अगदी विस्तारपूर्वक अभिव्यक्त केलेले असत; अर्थातच ते त्यांचे स्वतःचेदेखील अनुभव असत.

खरे सांगायचे तर, अज्ञातामधील किंबहुना, अतिमानसामधील आमच्या एकत्रित साहसाचे सावित्री हे जणू प्रतिबिंबच आहे. हे त्यांनी स्वतः घेतलेले अनुभव आहेत, या त्यांनी अनुभवलेल्या वास्तविकता आहेत, पारलौकिक सत्यं आहेत. एखादी व्यक्ती ज्याप्रमाणे भौतिकरित्या आनंदाचा किंवा दुःखाचा अनुभव घेते, त्याप्रमाणे त्यांनी हे सारे अनुभव घेतलेले आहेत.

### सावित्री : रूपांतरणाचा समग्र योग

सार्वभौम विपुलतेमध्ये मोकळा श्वास घेता यावा आणि परम आनंदामध्ये प्रवेश करता यावा यासाठी, श्रीअरविंदांनी अचेतनाच्या घनांधकारात मार्गक्रमण केले आहे, मृत्युला आपला सोबती बनवून त्यांनी वाटचाल केली आहे. विनाशाचे दुःखही त्यांनी सहन केले आहे आणि त्या चिखलामधून, जगाच्या दुःखामधून ते बाहेर पडले आहेत. हे सारे प्रांत त्यांनी पार केले, त्याच्या परिणामांना तोंड दिले आणि व्यक्ती ज्याची कल्पनाही करू शकणार नाही अशा गोष्टी अगदी शारीरिक दृष्ट्यादेखील त्यांनी सहन केल्या आणि त्यामध्ये ते अविचल राहिले. त्यांच्याइतके दुःखभोग आजवर कोणीही सहन केलेले नाहीत. दुःखभोगाचे रूपांतर

पुरुषोत्तमाच्या ऐक्यानंदामध्ये करण्यासाठी त्यांनी दुःखभोगांचा स्वीकार केला. जगाच्या इतिहासामध्ये ही एकमेवाद्वितीय आणि अतुलनीय अशी गोष्ट आहे. आजवर हे असे कधीही घडून आलेले नाही. आपल्याला अतिमानसाप्रत अगदी खात्रीपूर्वक वाटचाल करता यावी म्हणून, अज्ञाताचा मार्ग पादाक्रांत करणारे ते पहिलेच आहेत. आपल्या सर्वांचे काम श्रीअरविंदांनी सोपे केले आहे. 'सावित्री' म्हणजे त्यांचा रूपांतरणाचा समग्र योग आहे आणि हा योग आता पृथ्वी–चेतनेमध्ये प्रथमच दिसून येत आहे.

**सावित्री : भविष्यकालीन महाकाव्य**

मला असे वाटते की, मानव अजून या योगाचा स्वीकार करण्यास सिद्ध झालेला नाही. त्याच्यासाठी हा योग खूपच उच्च आणि खूपच विशाल आहे. मानवाला त्याचे आकलन होऊ शकत नाही, ते त्याच्या आवाक्यात येत नाही कारण सावित्रीचे आकलन हे मनाच्या माध्यमातून करायचे नसते. सावित्रीचे आकलन होण्यासाठी आणि आत्मसात करण्यासाठी व्यक्तीला आध्यात्मिक अनुभूती आलेली असणे आवश्यक आहे. व्यक्ती या योगमार्गावर जसजशी अधिकाधिक प्रगत होत जाते, तसतशी ती अधिकाधिक, चांगल्या रितीने सावित्री आत्मसात करू शकते.

ही अशी एक गोष्ट आहे की जिची खरी कदर भावी काळातच केली जाईल. श्रीअरविंदांनी 'द फ्युचर पोएट्री' या कवितेमध्ये ज्याचा उल्लेख केला आहे त्या प्रकारचे हे भविष्यकालीन काव्य आहे. ते अगदी सूक्ष्म, अगदी विशुद्ध असे आहे. मनामध्ये किंवा मनाच्या माध्यमातून 'सावित्री'चा साक्षात्कार होणार नाही, तर ध्यानामध्येच 'सावित्री' प्रकट होते.

व्हर्जिल किंवा होमर यांच्या साहित्यकृतीशी 'सावित्री'ची तुलना करून, या महाकाव्याला स्फूर्तीच्या बाबतीत कमी लेखण्याचे दुःसाहस माणसं करतात. त्यांना त्याचे आकलन होत नाही आणि ते होणारही नाही. त्यांना काय माहीत? ते काहीच जाणत नाहीत. आणि त्यांना समजावून

सांगण्याचा प्रयत्न करणेही व्यर्थ आहे. त्यामध्ये काय आहे हे माणसांना ज्ञात होईल पण ते दूरवरच्या भविष्यात! नूतन चेतना प्राप्त झालेल्या नवीन वंशालाच त्याचे आकलन होणे शक्य आहे. मी खात्रीपूर्वक सांगते की, या खुल्या आकाशाखाली सावित्री महाकाव्याशी ज्याची बरोबरी होऊ शकेल अशी कोणतीही साहित्यकृती नाही.

'सावित्री' हे रहस्यांचे रहस्य आहे. ते परम–महाकाव्य आहे, ते परम–साहित्य आहे, ते परम–काव्य आहे, ती परम–दृष्टी आहे. श्रीअरविंदांनी लिहिलेल्या काव्यपंक्तीच्या संख्येचा (सुमारे २४०००) नुसता विचार जरी केला तरीदेखील लक्षात येईल की, ते परम–कार्य आहे. सावित्रीचे वर्णन करण्यासाठी मानवी शब्द पुरेसे नाहीत. त्याचे वर्णन करण्यासाठी व्यक्तीला सर्वोच्च श्रेणीचा किंवा अत्युक्तीचाच वापर करावा लागतो; कारण ते महा–महाकाव्य आहे. खरोखरच, 'सावित्री' काय आहे हे सांगण्यासाठी शब्द अपुरे आहेत. ते सांगण्यासाठी चपखल विशेषणेच नाहीत, निदान मला तरी त्यासाठी शब्द सापडले नाहीत.

सावित्रीचे मोल प्रचंड आहे. त्यास आध्यात्मिक मूल्य आहे, इतरही सगळी मूल्यं आहेत. विषयाच्या दृष्टीने हे महाकाव्य शाश्वत आहे, त्याचे आवाहन हे अनंत आहे, त्याची पद्धती आणि कार्य करण्याची शक्ती अद्‌भुत आहे. ती एकमेवाद्वितीय गोष्ट आहे, तुम्ही जितके तिच्या अधिक संपर्कात याल तेवढे तुम्ही अधिकाधिक उन्नत व्हाल आणि खरोखर हे अद्‌भुत आहे. श्रीअरविंदांनी मनुष्याला देऊन ठेवलेली ही सर्वाधिक सुंदर गोष्ट आहे, शक्य अशी सर्वोच्च गोष्ट आहे. काय आहे ती? मनुष्याला ती कधी ज्ञात होईल? तो सत्याचे जीवन जगायला कधी सुरुवात करणार आहे? यामध्ये उद्‌धृत केलेल्या गोष्टी तो स्वतःच्या जीवनात कधी अमलात आणणार आहे? हे जाणणे अजून बाकी आहे.

### आत्मज्योतीची जागृती

तुम्ही आता दररोज 'सावित्री'चे वाचन करण्याचे ठरविले आहे तर

योग्य रितीने, योग्य दृष्टिकोन ठेवून वाचन करा. पानं उघडण्यापूर्वी काही क्षण चित्त एकाग्र करा आणि मन होता होईल तितके रिते करा, एकही विचार मनात येता कामा नये. सावित्रीपर्यंत पोहोचायचे असेल तर तो मार्ग अंतःकरणातून जातो.

मी तुम्हाला सांगते, तुम्ही खरोखर या ओढीने जर एकाग्र झालात तर तुम्ही ती ज्योत, चैत्य ज्योत, शुद्धीकरणाची ज्योत अगदी अल्प काळात, कदाचित अगदी काही दिवसांमध्येसुद्धा प्रज्वलित करू शकाल. साधारणपणे एरवी तुम्ही जे करू शकणार नाही ते तुम्ही सावित्रीच्या साहाय्याने करू शकाल.

प्रयत्न करा. जणूकाही श्रीअरविंदांना तुम्ही अर्पण करत आहात, या वृत्तीने तुम्ही ते वाचलेत, तुमच्या चेतनेमध्ये ही गोष्ट ठेवून तुम्ही त्याचे वाचन केलेत तर, मग तुमच्या लक्षात येईल की, केवढे वेगळे आहे ते, किती नूतन आहे!

**मार्गदर्शक सावित्री**

तुम्हाला माहीत आहे, हे काव्य किती भारलेले आहे ते, चेतनेने पूर्णपणे भारलेले आहे! जणूकाही सावित्री म्हणजे एखादं खरंखुरं मार्गदर्शक व्यक्तित्व आहे. मी तुम्हाला सांगते, ज्याला कोणाला योगसाधना करण्याची इच्छा आहे, ज्याला ती निकड जाणवते आणि जो कोणी त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करतो, त्याला सावित्रीच्या साहाय्याने योगाच्या शिडीवरील सर्वांत वरच्या पायरीपर्यंत पोहोचणे शक्य आहे; तो ही साधना कोठेही करू शकेल. सावित्री ज्याचे प्रतिनिधित्व करते ते रहस्य त्याला उमगणे शक्य आहे आणि ते सुद्धा कोणत्याही गुरुच्या साहाय्याविना!

सावित्री हे महाकाव्यच त्याच्यासाठी एकमेव मार्गदर्शक असेल, कारण त्याला ज्या ज्या कोणत्या गोष्टीची गरज पडेल ती गोष्ट त्याला सावित्रीमध्येच मिळेल. एखादी अडचण आली असताना किंवा पुढे जाण्यासाठी नेमके कोणत्या दिशेला वळावे हे जर त्याला कळत नसेल

किंवा अडथळ्यांवर मात कशी करायची हे जर लक्षात येत नसेल तर, अशा प्रत्येक द्विधा मनःस्थितीच्या वेळी, अनिश्चिततेच्या वेळी, जी परिस्थिती आपल्याला हेलपाटून टाकते अशा प्रत्येक क्षणाला, तो जर काही काळ अगदी शांतचित्त राहिला तर, आवश्यक त्या सूचना, आवश्यक असणारी अगदी भरभक्कम अशी मदत त्याला मिळू शकते. तो जर अगदी अविचल आणि खुला राहू शकला आणि त्याने अगदी प्रामाणिकपणे आस बाळगली तर, जणूकाही आपल्याला कोणीतरी हाताला धरून चालवीत आहे, असा अनुभव त्याला नेहमीच येत राहील. त्याच्याकडे जर श्रद्धा असेल, आत्म–समर्पण करण्याची इच्छा असेल आणि आवश्यक तो प्रामाणिकपणा असेल तर तो अंतिम ध्येयापर्यंत निश्चितपणे पोहोचेल.

खरोखरच, सावित्री म्हणजे सघन, जिवंत, चेतनेने ओतप्रोत भरलेले असे, परिपूर्ण काहीतरी आहे; सर्व मानवी तत्त्वज्ञानांच्या आणि धर्मांच्या अतीत असणारे सावित्री हे महाकाव्य म्हणजे परमज्ञान आहे. सावित्री हे महाकाव्य म्हणजे आध्यात्मिक मार्ग आहे, योग आहे, तपस्या आहे, साधना आहे, सारे काही त्यामध्येच सामावलेले आहे.

सावित्रीमध्ये असामान्य शक्ती आहे आणि जो कोणी त्यातून प्रस्फुरित होणाऱ्या स्पंदनांचे ग्रहण करू शकेल, त्याच्यासाठी सावित्रीमधून चेतनेच्या प्रत्येक अवस्थेची खरीखुरी स्पंदने प्रस्फुरित होतात.

सावित्री अतुलनीय आहे, सावित्री म्हणजे विपुलतेतील सत्य, आहे. हे असे सत्य आहे की, जे श्रीअरविंदांनी या पृथ्वीवर उतरविले आहे.

सावित्री ज्याचे प्रतिनिधित्व करते ते रहस्य आणि श्रीअरविंदांनी आपल्यासमोर जो भविष्यवेधी संदेश प्रकट केला आहे, तो संदेश शोधण्याचा व्यक्तीने प्रयत्न केला पाहिजे. हे कार्य तुम्हाला नेमून देण्यात आले आहे, ते अवघड जरूर आहे पण परिश्रम करण्यायोग्य आहे.

– श्रीमाताजी (Sweet Mother by Mona Sarkar)

**

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# अमल किरण आणि सावित्री

के. डी. सेठना ऊर्फ अमल किरण हे उत्तम कवी होते. 'श्रीअरविंद सध्या सावित्री या महाकाव्याचे लेखन करत आहेत,' अशी वार्ता त्यांच्या कानी आली. साहजिकच त्यांना 'सावित्री' महाकाव्य वाचण्याची अतीव उत्सुकता निर्माण झाली.

पूर्वी अमल किरण यांच्या विनंतीवरून, श्रीअरविंद यांनी विविध वृत्तांमधील काव्यरचना तयार करून दिल्या होत्या. तेव्हा तशाच प्रकारे ''मला अधिमानसिक स्तरावरील काव्यपंक्ती लिहून द्या. फार नाहीत, अगदी सात–आठ ओळी लिहून दिल्यात तरी चालतील,'' अशी त्यांनी श्रीअरविंदांना प्रेमाने गळ घातली.

तेव्हा श्रीअरविंदांनी त्यांना लिहिले की, ''छंदोबद्ध काव्यरचना करणे तुलनेने सोपे आहे. पण, अधिमानसिक स्तरावरील काव्यनिर्मिती ही मागणी तसा पुरवठा या न्यायाने होणे शक्य नाही. मी फार फार तर एवढे करू शकतो की, 'सावित्री' या काव्यातील आत्तापर्यंत झालेले लिखाण तुम्हाला पाठवतो.'' पुढे २५ ऑक्टोबर १९३६ या दिवशी अमल किरण यांना श्रीअरविंद लिखित सावित्री महाकाव्याचा पहिला भाग मिळाला. ते त्या लिखाणाने अक्षरशः भारावून गेले. त्यांची मनीषा पूर्ण झाली होती.

पुढे मग सावित्रीचे सर्वच लिखाण अमल किरण यांच्याकडे नियमितपणे टंकलेखनासाठी आणि अभिप्रायासाठी येऊ लागले. या निमित्ताने त्या दोघांच्या दरम्यान सावित्रीबाबत बराच पत्रव्यवहार झाला. स्वतः श्रीअरविंद हे अमल किरण यांच्याकडून आलेल्या सूचना विचारात घेत असत आणि सावित्री महाकाव्य 'संपूर्णपणे परिपूर्ण' असावे यासाठी प्रसंगी मूळ लिखाणात फेरफार देखील करत असत. पुढे अमल किरण यांनी या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी, मुद्रितशोधनासाठी अपार परिश्रम घेतले. श्रीअरविंद यांनी लिहिलेले लेखन अगदी यथातथ्यपणे, निर्दोषपणे वाचकांपर्यंत पोहोचावे यासाठी त्यांनी अक्षरशः जिवाचे रान केले.

(Sri Aurobindo - the poet by Amal Kiran)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमश:)

### २४ एप्रिल २००८

आंतरिक एकाग्रतेच्या साधनेमध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो –

१) हृदयामध्ये चेतना स्थिर करणे आणि तिथे दिव्य मातेचे नाम, तिची प्रतिमा किंवा संकल्पना, यांपैकी तुमच्यासाठी जे सहजस्वाभाविक असेल त्यावर चित्त एकाग्र करणे.

२) हृदयातील या एकाग्रतेच्या साहाय्याने मन हळूहळू आणि क्रमश: शांत शांत करत नेणे.

३) हृदयामध्ये श्रीमाताजींची उपस्थिती असावी यासाठी तसेच आपले मन, प्राण व कृती यांचे नियंत्रण त्यांनी करावे यासाठी आस बाळगणे.

परंतु मन स्थिर, अविचल होण्यासाठी व आध्यात्मिक अनुभूती येण्यासाठी, प्रकृतीचे शुद्धीकरण होणे आणि तिची तयारी होणे आवश्यक असते.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 225)

*

### १५ ऑगस्ट २००८

साधनेचे गुह्य हे, कशाची तरी मागणी करणे किंवा काहीतरी मिळविणे नसून, स्वतःला अर्पण करणे हे आहे. व्यक्ती जेवढे जास्त आत्मदान करेल तेवढ्या प्रमाणात तिची ग्रहणक्षमता वृद्धिंगत होईल.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 345)

*